| | पोलीस उप-आयुक्त, वाहतूक शाखा, पिंपरी-चिंचवड<br>कार्यालय- चिंचवडगाव बस स्टॉप, व्यापारी संकुल, पहिला मजला, चिंचवड पुणे ४११०३३<br>piplanning.pcpc-mh@gov.in | |
|---|---|---|

जा.क्र./पोउआ/वाह/नियोजन/कार्तिकी/५१०८२४/२०२३ दिनांक - २४/११/२०२३

## वाहतूक नियंत्रण अधिसुचना

दि.०५/१२/२०२३ ते १२/१२/२०२३ रोजी पर्यंत श्री क्षेत्र आळंदी येथे कार्तिक यात्रा भरणार आहे. दि.०९/१२/२०२३ रोजी कार्तिकी एकादशी तसेच ११/१२/२०२३ रोजी संत श्रेष्ठ श्री ज्ञानेश्वर महाराजांचा संजीवन समाधी सोहळयानिमित्त आळंदीमध्ये महाराष्ट्राच्या व देशाच्या कानाकोपऱ्यातुन सुमारे ६ ते ७ लाख भाविक येत असतात. बहुसंख्य भाविक हे आळंदी येथून देहूगाव गाथा मंदिर व भंडारा डोंगर येथेही मोठ्या प्रमाणात दर्शनासाठी जात असतात.

ज्याअर्थी पिंपरी चिंचवड शहरातील वाहतुक सुरक्षित व सुरळीतपणे होणेकरीता, महाराष्ट्र शासन गृह विभाग क्र. एम. व्ही. ए. ०१९६/८७१/सी आर - ३७/टी आर ए - २, दिनांक - २७/०९/१९९६ चे नोटीफिकेशन नुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६(१) (ए) (बी), ११६(४) आणि ११७ अन्वये मला अधिकार प्राप्त झाला आहे त्याअर्थी मी बापू बांगर, पोलीस उप-आयुक्त, वाहतुक शाखा, पिंपरी चिंचवड शहर, यापुर्वी काही निर्बंध असतील ते रद्द करण्यात येत असुन खालील प्रमाणे तात्पुरते स्वरुपात आदेश निर्गमित करण्यात येत आहेत.

### दिघी-आळंदी/देहुरोड/तळवडे/चाकण वाहतुक विभाग अंतर्गत

| अ.क्र | प्रवेश बंदी करण्यात येणारा मार्ग | पर्यायी मार्ग |
|---|---|---|
| १. | मोशी चौक येथुन आळंदीकडे येणाऱ्या वाहणांना प्रवेश बंद | १. जयगणेश साम्राज्य चौक, अलंकापुरमचौक मार्गे चोविसावाडी/विश्रांतवाडी/भोसरी<br>२. भोसरी चौक- मॅगझीन चौक मार्गे विश्रांतवाडी<br>३. मोशी-चाकण- शिक्रापुर मार्गे |
| २. | भारतमाता चौक, मोशी येथुन आळंदीकडे येणाऱ्या वाहनांना प्रवेश बंद | १. जयगणेश साम्राज्य चौक, अलंकापुरम चौक मार्गे चोविसावाडी/विश्रांतवाडी/भोसरी<br>२. भोसरी चौक - मॅगझीनचौक मार्गे विश्रांतवाडी<br>३. मोशी-चाकण ते शिक्रापुर मार्गे |
| ३. | चिंबळीफाटा चौक, चाकण येथुन आळंदीकडे येणाऱ्या वाहनांना प्रवेश बंद | १. जयगणेश साम्राज्य चौक, अलंकापुरम चौक मार्गे चोविसावाडी/विश्रांतवाडी/भोसरी<br>२. भोसरी चौक मॅगझीन चौक मार्गे विश्रांतवाडी |
| ४. | आळंदी फाटा चौक, चाकण येथुन आळंदीकडे येणाऱ्या वाहनांना प्रवेश बंद | १. जयगणेश साम्राज्य चौक, अलंकापुरम चौक मार्गे चोविसावाडी/विश्रांतवाडी/भोसरी<br>२. भोसरी चौक मॅगझीन चौक मार्गे विश्रांतवाडी |
| ५. | चाकण-वडगांव घेणंद मार्गे आळंदीकडे येणाऱ्या वाहनांना प्रवेश बंद | १. कोयाळी कमान, कोयाळी- मरकळगाव मार्गे पुणे |
| ६. | मरकळमार्गे आळंदीकडे येणाऱ्या वाहणांना प्रवेश बंद | धानोरी फाटा- चऱ्होली फाटा मार्गे भोसरी-विश्रांतवाडी |
| ७. | पुणे-दिघी मॅगझीन चौक मार्गे आळंदीकडे येणाऱ्या वाहणांना प्रवेश बंद | १. भोसरी मार्गे- मोशी- चाकण<br>२. अलंकापुरम-जयगणेश साम्राज्य चौक मार्गे-चाकण<br>३. चऱ्होली फाटा – धानोरीफाटा मार्गे- मरकळ पुणे |
| ८. | देहुगाव कमान (जुना मुंबई-पुणे हायवे) येथुन देहुगाव कडे येणाऱ्या वाहणांना प्रवेश बंद | भक्ती-शक्ती चौक ते त्रिवेणीनगर ते तळवडे गावठाण ते कॅनबे चौक ते खंडेलवाल चौक देहुगाव |
| ९. | महिंद्रा सर्कलकडुन फिजुत्सु कॉर्नर अथवा कॅनबे चौक/आयटी पार्क चौक हा रस्ता चाकण कडुन येणाऱ्या सर्व वाहनासाठी प्रवेश बंद करण्यात येत असून फक्त तळवडे | महिंद्रा सर्कल ते निघोजे ते मोईफाटा मार्गे डायमंड चौक |

Scanned with OKEN Scanner

| | | |
|---|---|---|
| | ते आयटी पार्क ते महिंद्रा सर्कल असे वन वे करण्यात येत आहे. | |
| १० | तळेगाव-चाकण रोड वरील देहुफाटा येथुन देहुगाव जाणारे रस्त्यावरुन सर्व प्रकारची जड वाहतुकीस प्रवेश बंद | एच.पी.चौक मार्गे इच्छित स्थळी जातील |
| ११ | देहु कमान ते चौदा टाळकरी कमान ते भैरवनाथ चौक हा रस्ता सर्व प्रकारचे वाहनांसाठी बंद राहील. | |

तसेच सदर कालावधीत मंदिर परिसरात आपातकालीन परिस्थिती उद्‌भवल्यास भाविकांसाठी खालीलप्रमाणे आपातकालीन मार्ग निश्चित करण्यात आलेला आहे.

आपातकालीन मार्ग :-**श्री ज्ञानेश्वर मंदिर- पान दरवाजा- संत कबीरबुवा मठासमोरुन- राम घाट- इंद्रायणी नदी घाट**

**देहू तसेच आळंदीकडे दर्शनासाठी येण्याच्या मार्गावरील भाविकांचे वाहनांसाठी पार्किंग व्यवस्था –**

| अ.क्र | वाहनांचा मार्ग | पार्किंगचे ठिकाण |
|---|---|---|
| १. | तळेगांव इंदोरी कडुन येणारी वाहने | बायपास रोडवर देहुगाव गायरान मैदान, ओम डेव्हलपर्स प्लॉट |
| २. | तळवडे व कॅन बे (आय टी)चौकाकडुन येणारी वाहने | खंडेलवाल चौक ते डाव्या बाजुकडून परंडवाल चौकाकडे जाणारे रिंग रोडवर व आजु बाजच्या मोकळया जागेवर |
| ३. | वडगावकडून येणारी वाहने | वडगाव चौक, आळंदी शौचालयाजवळील नगरपरिषद पार्किंग |
| ४. | चाकण आळंदी फाट्याकडून येणारी वाहने | इंद्रायणी हॉस्पीटल समोर |
| ५. | आळंदी तसेच चिंबळी फाट्याकडून येणारी वाहने | बोपदेव चौकाजवळील मुंगसे पार्किंग |
| ६. | देहूगाव, मोशी, हवालदार वस्ती फाट्याकडून येणारी वाहने | वहिले पार्किंग व ज्ञानविलास कॉलेज डुडुळगाव |
| ७. | देहूगाव, मोशी, हवालदार वस्ती फाट्याकडून येणारी वाहने | कचरे हॉस्पीटल गाथा मंदिराकडे जाणाऱ्या रस्त्यावर |

**आळंदी येथून जाणाऱ्या एस.टी/पीएमपीएमएल बसची स्टॅण्ड ची ठिकाणे**

| अ.क्र | ठिकाण | मार्ग |
|---|---|---|
| १. | सर्व ठिकाणी जाण्याकरिता | फक्त एस. टी बसेस, बसस्टॅण्ड योगिराज चौक |
| २. | देहूगावकडे जाण्याकरिता | एस.टी/पीएमपीएमएल डुडुळगाव जकात नाका |
| ३. | पुणे बाजूकडे जाण्याकरिता | एस. टी बसेस/ पीएमपीएमएल बसेस चऱ्होली फाटा |

**तरी वरील प्रमाणे दि.०५/१२/२०२३ रोजी ०९.०० वा ते दि.१२/१२/२०२३ रोजी २४.०० वा पर्यंत देहुकडे तसेच आळंदी कडे जाणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना (दिंडीतील वाहने व अत्यावश्यक सेवेची वाहने वगळुन) प्रवेश बंदी तसेच भाविकांसाठी पार्किंगची व्यवस्था करण्यात आलेली असुन त्याप्रमाणे वाहतुकीत बदल केलेबाबत आदेश (नोटिफिकेशन) निर्गमित करण्यात येत आहे.**

24/11/2023.

(बापू बांगर)
पोलीस उप आयुक्त
वाहतूक शाखा,पिंपरी चिंचवड

प्रति,

जिल्हा माहिती व प्रसिध्दी अधिकारी, नविन मध्यवर्ती इमारत, पुणे - ०१.

प्रत :

१) मा. पोलीस आयुक्त सो,पिंपरी चिंचवड शहर

२) पोलीस निरीक्षक, प्रेसरुम, पोलीस आयुक्त कार्यालय, पिंपरी चिंचवड शहर.

/-सदर प्रेसनोटच्या प्रती पत्रकारांना देवून, सदरची बातमी वर्तमान पत्रातून प्रसिध्द करण्याची विनंती करावी.


३) प्रभारी अधिकारी संबंधित वाहतुक विभाग व सर्व पो.स्टे प्रभारी अधिकारी

४) मा. मुख्याधिकारी आळंदी नगरपरिषद, आळंदी

/- सदर ठिकाणी वरील वाहतुक निर्बधाचे फलक बसविणेची कार्यवाही होणेस विनंती आहे.

Scanned with OKEN Scanner

# श्री संत ज्ञानेश्वर महाराज संजीवन समाधी सोहळा
# पिंपरी चिंचवड वाहतुक शाखा




| | |
|---|---|
| VIP मार्ग | |
| पार्कींग | P |
| डायव्हर्शन पॉईंट | ★ |
| श्री संत ज्ञानेश्वर मंदीर | |
| पालखी मार्ग | |
| बॅरीकेट पॉईंट | |
| चौक | |